


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे

गणपती बाप्पा मोरया

वर्धापन दिन

वर्ष ५ । अंक ११ । शनिवार २६ सप्टेंबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २  https://epaper.dainikaakarshan.com  E-mail- dainikaakarshan@gmail.com  RNI NO. MAHMAR/2021/84322




शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे विसर्जन मिरवणुकप्रसंगी महापूजा करून आरती करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज अशिया व सौ. अशिया. समवेत संगमनाथ महाराज अध्यक्ष ॲड. अभय आगारकर व विश्वस्त. (छाया - राजू खरपुडे)

### श्री विशाल गणपतीच्या महाआरतीने गणेश विसर्जन मिरवणूक भक्तिमय वातावरण

## शहराचा सांस्कृतिक व पारंपरिक वारसा असाच जोपासावा – आ. संग्राम जगताप

### दुष्काळाचे सावट लवकर दूर व्हावे, श्री गणेशाच्या चरणी आमदार जगताप यांची प्रार्थना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** गणेश विसर्जनानिमित्त शहरात गणेशभक्तांनी मोठ्या उत्साहात, आनंदात आणि भक्तिभावाने आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत नगरकर मोठ्या संख्येने सहभागी झाले. पारंपरिक व सांस्कृतिक वारसा जपत भक्तिभावाने गणरायाचे दर्शन घेत भक्तांनी बाप्पाला निरोप दिला. यावेळी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपतीची महाआरती आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाली.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, अशोक कानडे, प्रा. माणिक विधाते, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले यांच्यासह गणेशभक्त ■ पान ४ वर

## मातोश्री वृद्धाश्रमात रक्तरंजित थरार

### दोघांचा मृत्यू, सहा जण गंभीर जखमी । आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर-मनमाड रस्त्यावरील मातोश्री वृद्धाश्रमात शनिवारी पहाटे सुमारे सहा वाजता रक्तरंजित हल्ल्याची घटना घडली. वृद्धाश्रमातील राजू घुले (रा. कुंभारी गावठाण, कोपरगाव) याने तेथील सुरक्षारक्षकासह इतर वृद्धांवर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेत सुरक्षारक्षक आणि एका वृद्धाचा मृत्यू झाला असून, सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

मृतांमध्ये महाकालेश्वर बाबासाहेब हेणे (वय ५४) आणि दत्तात्रेय शंकर हारके (वय ८०) यांचा समावेश आहे. तर गणेश छबू घोडके (वय ६०), बाळासाहेब अंबादास घाडगे (वय ७८), गोरख हरिभाऊ फुंदे (वय ७४), साहेबराव दगडू भवर (वय ५८), लिंबराज दामोदर फिस्के (वय ८०) आणि संतोष भिमराज पिरंगळ (वय ६०) हे जखमी झाले आहेत. यापैकी एका जखमीची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास राजू घुले याने प्रथम वृद्धाश्रमाच्या प्रवेशद्वाराजवळील सुरक्षारक्षकावर हल्ला केला. या हल्ल्यात सुरक्षारक्षकाचा मृत्यू झाला. त्यानंतर घुले वृद्धाश्रमाच्या परिसरात गेला आणि आणखी एका व्यक्तीवर हल्ला केला. त्यातही संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाला. यानंतर घुले याने वृद्धाश्रमातील इतर रहिवाशांवर हल्ला केला. या घटनेत सहा जण जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

हल्ल्यानंतर काही वृद्धांनी वृद्धाश्रमाच्या समोरील पेट्रोलपंपावर जाऊन पोलिसांशी संपर्क साधल्याची माहिती आहे. त्यानंतर पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेची सुरुवातीची माहिती मिळताना काही काळ संभ्रमाचे वातावरण होते. वृद्धाश्रमात दरोडा पडल्याची शक्यताही व्यक्त केली जात होती. मात्र, वृद्धांनी पोलिसांना घटनाक्रम सांगितल्यानंतर आणि वृद्धाश्रमातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर हल्ल्याचे चित्र स्पष्ट झाले. दरम्यान फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली. घटनेची माहिती मिळताच वृद्धाश्रमाचे अध्यक्ष विक्रम राठोड आणि संचालक छाजेड यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याची व्यवस्था केली तसेच वृद्धाश्रमातील इतर रहिवाशांना धीर दिला. वृद्धाश्रमातील एकाने ■ पान ४ वर

## खासदारांना स्वीडन कुठं ते माहित नाही ! दोन वर्षांत १ रुपयांचा निधी आणू शकले नाही

### कौटुंबिक वादात राजकारण करणं जिल्ह्यासाठी धोकादायक : डॉ सुजय विखे पाटील

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** खासदारांचे काही ठरलेले डायलॉग आहेत. त्यांना स्वीडन कुठे आहे, हेही माहिती नाही, त्यामुळे त्यांनी या विषयावर भाष्य करू नये. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मागील दोन वर्षांत या जिल्ह्याच्या विकासासाठी एक रुपयाचाही निधी आणता आला नाही. जिल्ह्यासाठी ठोस काम करता आलं नाही. त्यामुळे दुसऱ्यांच्या कौटुंबिक वादात किंवा कौटुंबिक संवादात पडून त्याचं राजकारण करणं, ही विचारसरणीच या जिल्ह्यासाठी धोकादायक आहे.

राजकीय व्यक्तीचं राजकीय आणि ■ पान ४ वर

## छावणीतील प्रश्नांना आता 'डेडलाइन'

### खासदार नीलेश लंके यांच्या प्रशासनाला कालबद्ध कार्यवाहीच्या सूचना । भुईकोट किल्ला, कापूरवाडी तलाव, रुग्णालय, शाळांतील शिक्षकांची रिक्त पदे, पाणीटंचाई, रस्ते आणि करप्रश्नांचा आढावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर छावणी परिषद हद्दीतील नागरिकांच्या विविध मूलभूत प्रश्नांवर ठोस आणि कालबद्ध कार्यवाही करण्याच्या सूचना खासदार नीलेश लंके यांनी प्रशासनाला दिल्या. छावणी परिषदच्या बैठकीत नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. केवळ प्रश्नांवर चर्चा न करता प्रत्येक कामासाठी जबाबदार अधिकारी, आवश्यक निधी आणि काम पूर्ण करण्याची कालमर्यादा निश्चित करून त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

भुईकोट किल्ल्याच्या पर्यटन विकासासाठी झालेल्या सामंजस्य कराराच्या पार्श्वभूमीवर प्रलंबित प्रशासकीय बाबी तातडीने मार्गी लावण्याची सूचना करण्यात





आली. विकास आराखड्याची अंमलबजावणी सुरू करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे सांगण्यात आले. ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याचा विकास अहिल्यानगरच्या पर्यटन आणि सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

छावणी परिसरातील रस्ते आणि पादचारी सुरक्षेचाही बैठकीत विशेष आढावा घेण्यात आला. सी आर आर आय मार्फत सेफ्टी ऑडिट करण्याच्या प्रस्तावावर चर्चा झाली. फुटपाथ, झेब्रा क्रॉसिंग, वाहतूक चिन्हे, पथदिवे, स्पीड ब्रेकर आणि अन्य सुरक्षाविषयक उपाययोजनांचा तांत्रिक अभ्यास करून आवश्यक त्या उपाययोजना प्रत्यक्षात आणण्याच्या सूचना देण्यात आल्या.

कापूरवाडी तलाव संरक्षण विभागाच्या हद्दीत असून तलाव परिसरात वाढलेली झाडे-झुडपे, जलपर्णी आणि गाळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचीही दखल घेण्यात आली. तलावाची स्वच्छता, गाळ काढणे, खोलीकरण तसेच परिसराचे संवर्धन करण्याची कामे तातडीने हाती घेण्याची सूचना करण्यात आली. तलावाच्या दीर्घकालीन संवर्धनासाठी कायमस्वरूपी ■ पान ४ वर

## अमोल कातोरे यांची उपाध्यक्षपदी निवड

### शिवनेरी वितरीकास्तरीय पाणी वापर संस्था महासंघाची जबाबदारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे तसेच कुकडी पाटपंधारे विभाग क्र. १, नारायणगाव यांच्या कार्यक्षेत्रातील शिवनेरी वितरीकास्तरीय पाणी वापर संस्था महासंघ, कुकडी प्रकल्प, नारायणगाव, ता. जुन्नर येथे अमोल कातोरे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

पाणी वापर संस्था आणि शेतकरी यांच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच कुकडी प्रकल्पातील पाण्याचे योग्य नियोजन, वितरण आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रश्नांसाठी काम करण्याची संधी या निवडीमुळे मिळणार आहे.



अमोल कातोरे यांच्या निवडीबद्दल परिसरातील शेतकरी बांधव, पाणी वापर संस्था पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. शेतकऱ्यांच्या पाणीविषयक प्रश्नांना न्याय देण्यासाठी आणि पाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा उपयोग होईल, अशी अपेक्षा शेतकरी बांधवांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## श्री सिद्धेश्वर बाल मंडळाचा 'विकासाचे महामेरु सुजयदादा' हा लक्षवेधी देखावा!









**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तोफखाना परिसरातील श्री सिध्देश्वर बाल मंडळ, तोफखाना यांच्या वतीने यंदाच्या उत्सवात विकासाचे महामेरु सुजयदादा हा अत्यंत आकर्षक आणि माहितीपूर्ण देखावा साकारण्यात आला आहे. या देखाव्यातून शहरात झालेल्या विविध विकासकामांचा आणि प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे.

या देखाव्यात खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील विकासकामांवर भर देण्यात आला आहे. यामध्ये शहरात नव्याने झालेले उड्डाणपूल, सुसज्ज प्रशासकीय इमारत आणि भारतीय जनता पार्टीच्या ■ पान ४ वर

## दुष्काळाच्या यादीत पैठण तालुका; आ. भुमरे यांच्या पाठपुराव्याला यश

### आडूळ, बालानगर, पारुंडी, पाचोडसह ढोरकीन, वाहेगाव, थेरगाव भागातील शेतकऱ्यांना दिलासा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची दखल घेत पैठण तालुक्याचा पहिल्याच यादीत दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे. तालुक्याला दुष्काळग्रस्त यादीत स्थान मिळावे, यासाठी आमदार विलास बापू भुमरे यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.



पावसाने ओढ दिल्याने आडूळ, बालानगर, पारुंडी, पाचोड, थेरगाव, ढोरकीन, वाहेगाव यासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये खरीप पिकांवर संकट ओढवले होते. कापूस, सोयाबीन, तूर, बाजरी, मका यांसह फळबागांनाही पावसाअभावी ■ पान ४ वर

## अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेटच्या ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व विषयांना सभासदांची मंजुरी

### सभासदांच्या सूचना व मार्गदर्शनाचा स्वीकार; उत्कृष्ट कामगिरीबद्दल कारखानदार सभासदांचा सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर-पुणे रोड, केडगाव येथील अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड या औद्योगिक संस्थेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेचे सन्माननीय कारखानदार सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यावरील सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

सभेदरम्यान उपस्थित कारखानदार सभासदांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत विविध सूचना व मार्गदर्शन केले. संचालक मंडळाने सभासदांच्या सूचना सकारात्मकतेने स्वीकारून संस्थेच्या आगामी कामकाजात योग्य त्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले. औद्योगिक वसाहतीच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था आणि सभासद यांच्यातील सहकार्य अधिक दृढ करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

संस्थेच्या वतीने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कारखानदार सभासदांचा सन्मान करण्यात आला. तसेच संस्थेच्या संचालिका व माजी अध्यक्षा श्रीमती प्रमिलाबाई हेमराज बोरा यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्या भारतातील नामांकित उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते श्री. सौरभजी बोरा यांच्या मातोश्री आहेत. श्री. सौरभजी बोरा यांनी देशभरात आपल्या कार्याची विशेष ओळख निर्माण केली असून, तिरुमला तिरुपती देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्यांनी तीन वेळा जबाबदारी सांभाळली आहे. यावर्षी अहिल्यानगर येथे झालेल्या 'समर्पण चातुर्मास'मध्येही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. श्री. सौरभजी बोरा यांना सभेस उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले होते; मात्र व्यस्त कार्यक्रमामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या मातोश्री श्रीमती प्रमिलाबाई बोरा यांचा सन्मान करण्यात आला. तसेच संस्थेचे सभासद कारखानदार श्री. अमित खटोड हे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्याच्या निमित्ताने त्यांच्या टीमसोबत दावोस येथे गेले होते. त्यांच्या या सहभागाची दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांचाही सन्मान व गौरव करण्यात आला.

यावेळी अहमदनगर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे नवनियुक्त चेअरमन श्री. संजयजी फुलचंदजी चोपडा तसेच अहमदनगर ग्राहक भांडारचे चेअरमन श्री. विक्रमजी फिरोदिया यांचीही उपस्थिती होती. संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावरही भर देण्यात येत असून, संस्था टप्प्याटप्प्याने डिजिटलायझेशनच्या दिशेने वाटचाल करीत आहे. सभासदांना अधिक सुलभ, पारदर्शक व ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अमेरिकेतील ओहायो राज्यातील टोलेडो येथे ढोल-ताशांच्या गजरात गणेश विसर्जन



अहिल्यानगर - अमेरिकेतील ओहायो राज्यातील टोलेडो येथे गणेश विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. ढोल-ताशांच्या गजरात आणि गणरायाच्या जयघोषात भाविकांनी लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप दिला. या सोहळ्यामुळे अमेरिकेच्या भूमीवर मराठी संस्कृती आणि गणेशोत्सवाचा उत्साह अनुभवायला मिळाला. या विसर्जन सोहळ्यात छत्रपती फाउंडेशन अमेरिकेचे उपाध्यक्ष महेंद्र सिनारे, फाउंडेशनच्या युवती अध्यक्षा माधुरी सिनारे तसेच फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या निनादाने परिसर दुमदुमून गेला होता. पारंपरिक पद्धतीने गणरायाची मिरवणूक काढत भाविकांनी भक्तिभावाने विसर्जन सोहळा पूर्ण केला. यंदाच्या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महेंद्र सिनारे यांचे आई-वडीलही या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यास उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे सिनारे कुटुंबासाठी हा क्षण अधिक भावनिक आणि संस्मरणीय ठरला.अमेरिकेत वास्तव्यास असतानाही मराठी समाजाने आपल्या संस्कृतीशी असलेली नाळ कायम जपली असून, गणेशोत्सवाच्या माध्यमातून परंपरा आणि संस्कारांची जपणूक केली जात असल्याचे या सोहळ्यातून दिसून आले. गणरायाला भावपूर्ण निरोप देताना उपस्थित भाविकांच्या चेहऱ्यावर भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण होते.

### अहिल्यानगरकरांसाठी मोफत गरबा-दांडिया प्रशिक्षणाची संधी

अहिल्यानगर - नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ॲपॉस्ट्रॉफी नृत्य अकादमीच्या वतीने अहिल्यानगरकरांसाठी मोफत गरबा-दांडिया प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत नगर-मनमाड रस्त्यावरील बंधन लॉन्स येथे ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत गरबा, दांडिया, डोडिया, तीन ताली, चार ताली यांसह विविध आकर्षक गरबा नृत्यप्रकारांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. नवशिक्यांसह गरबा-दांडियाची आवड असलेल्या सर्व वयोगटातील नागरिकांना यामध्ये सहभागी होता येणार आहे. यानंतर दि. २८ सप्टेंबरपासून ११ दिवसांची विशेष गरबा-दांडिया प्रशिक्षण कार्यशाळा सुरू होणार असून त्यासाठी केवळ ४०० रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे. सहभागी प्रशिक्षणार्थींना छायाचित्रण, चित्रिकरण, भव्य नृत्य सादरीकरणाची संधी तसेच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अहिल्यानगरकरांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ॲपॉस्ट्रॉफी नृत्य अकादमीचे संस्थापक तथा नृत्यदिग्दर्शक अभिजीत शिर्के यांनी केले आहे.संपर्क : ८३०८८८२९६८ / ८२०८९५९८५३.

### गणेशोत्सवानिमित्त श्री एकदंत कॉलनीत रंगली महिलांची क्रिकेट स्पर्धा

अहिल्यानगर - श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त एकदंत कॉलनी, दातरंगे मळा येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या महिलांच्या क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वक्रतुंड महिला संघ आणि एकदंत महिला संघ यांच्यात झालेला सामना अतिशय उत्साहात रंगला.या स्पर्धेत १७ ते ६५ वयोगटातील महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. वयाची तमा न बाळगता महिलांनी मैदानावर उतरून दाखविलेला उत्साह उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात महिलांनी कौशल्याचे दर्शन घडवत सामन्यातील रंगत वाढविली. दहा षटकांच्या या सामन्यात वक्रतुंड महिला संघाने ४५ धावा करत ७ गडी गमावले, तर एकदंत महिला संघाने ४३ धावा करत सर्व १० गडी गमावले. अवघ्या दोन धावांनी वक्रतुंड महिला संघाने विजय मिळविला. अखेरच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

## गणेशोत्सवात सुरळीत वीज पुरवठ्यासाठी महावितरणचे मोलाचे सहकार्य – शैलेश मुनोत

### जय आनंद महावीर युवक मंडळात महावितरण अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हस्ते गणपतीची आरती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गणेशोत्सव साजरा करताना अखंड वीज पुरवठा महत्वाचा असतो. विशेषतः सायंकाळ नंतर गणेश भक्त मोठ्या संख्येने गणपती व देखावे पाहण्यासाठी गर्दी करतात. शहराच्या बाजारपेठेतील नवीपेठ परिसरात तर गणेश भक्त आवर्जून येत असतात. त्यामुळे या परिसरात वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणचे सर्व अधिकारी, कर्मचारी तत्पर असतात. वीज कर्मचारी मंडळाच्या वीजेचा अडचणी सोडविण्यासाठी वर्षभर सहकार्य करतात. त्यांना गणपतीची आरती करण्याचा मान देताना विशेष आनंद होत आहे. अनेकदा पावसातही वीज पुरवठ्यातील बिघाड तात्काळ दुरुस्त केला जातो. अशा शासकीय यंत्रणांच्या सहकार्यानेच सर्वांना उत्सवांचा आनंद घेता येतो, अशा भावना जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी व्यक्त केल्या.

शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्या गणेशोत्सवात तेलीखुंट पॉवर हाऊस येथील महावितरणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हस्ते गणपतीची सायंकाळची आरती करण्यात आली. यावेळी महावितरणचे डॉ. रोहण धर्माधिकारी, माधुरी मानकर, कुशल पडोळे, शरद सोनवणे, भावेश हराळे, आकश माळी, आदर्श बोरकर, भोसले यांच्यासह नवीपेठ येथील जैन धर्म शाळेचे अध्यक्ष बाळासाहेब भंडारी, संदीप चोपडा, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, सेक्रेटरी आनंद मुथा, बाबालाल गांधी, अजित गांधी, प्रकाश गांधी, नितीन मुनोत, संतोष कासवा आदी उपस्थित होते. मंडळातर्फे सर्व वीज कर्मचारी व बाळासाहेब भंडारी यांचा सत्कार करण्यात आला.

## धोत्रेकरांच्या एसटी थांब्याला अखेर हिरवा कंदील!

### आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश; नगरकल्याण मार्गावरील सर्व बसेस धोत्रेत थांबणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील धोत्रे बु. येथे अधिकृत एसटी बस थांबा मंजूर करण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष सुभाष सासवडे व राहुल सासवडे यांनी व धोत्रे ग्रामस्थांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. नगर-कल्याण महामार्गावरून जाणाऱ्या सर्व राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस धोत्रे येथे जाता-येता थांबवून प्रवाशांची चढ-उतार करण्याचे निर्देश अहिल्यानगर विभाग नियंत्रकांनी संबंधित आगार व्यवस्थापकांना दिले आहेत. त्यामुळे धोत्रे परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी व कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

धोत्रे बु. गावातील अनेक नागरिक रोजगार, व्यवसाय व शिक्षणाच्या निमित्ताने ठाणे, मुंबई, कल्याण आदी शहरांमध्ये वास्तव्यास आहेत. तसेच गावातील नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी एसटी बससेवेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. मात्र, गावात अधिकृत बस थांबा नसल्याने प्रवाशांना भाळवणी अथवा टाकळी ढोकेश्वर येथे जावे लागत होते. त्यामुळे प्रवाशांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात होते.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीमार्फत ३ ऑगस्ट २०२६ रोजी निवेदन देत धोत्रे येथे एसटी बस थांबा सुरू करण्याची मागणी केली होती.



> **धोत्रे येथे एसटी बस थांबा मिळावा यासाठी आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत परिवहन विभागाने नगर-कल्याण मार्गावरील सर्व एसटी बसेसना धोत्रे येथे जाता-येता थांबण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे ग्रामस्थांची अनेक दिवसांची मागणी पूर्ण झाली असून विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे.**
>
> **सुभाष सासवडे,**
> **कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, पारनेर**

त्यानंतर आमदार काशिनाथ दाते यांनीही ६ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर विभाग नियंत्रकांकडे पत्राद्वारे अधिकृत बस थांबा मंजूर करून नियमित बस थांबविण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत राज्य परिवहन अहिल्यानगर विभागाने आमदार दाते यांना पत्राद्वारे धोत्रे येथे नगर-कल्याण मार्गावरून जाणाऱ्या सर्व रा.प. बसेस जाता-येता थांबवून प्रवाशांची चढ-उतार करण्याबाबत संबंधित आगार व्यवस्थापकांना कळविण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

बस थांब्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक कार्याध्यक्ष सुभाष सासवडे, राहुल सासवडे, माजी सरपंच नंदकुमार भांड, चेअरमन हारकु भिटे, पंढरीनाथ तागड, शरद गवते, अविनाश रोकडे, कुंडलिक भांड, रभाजी भांड, सुधीर भांड, नवनाथ भांड, विक्रम मंचरे, नाना भांड, सुभाष भोसले, ज्ञानदेव नाईकवाडी, भाऊसाहेब पोस्टमन भांड, प्रशांत भांड, त्रिंबक भांड, संदीप भांड, विलास सासवडे, घमा भांड, बापूराव भांड, सुखदेव रोकडे, संतोष दोडमिशे, रंगा भांड, हरिभाऊ सासवडे, संजू सासवडे, तात्या पाचरणे, नारायण सासवडे, शेखर भांड, प्रमोद भांड, बाबासाहेब भांड आदी ग्रामस्थांनी सह्या करून मागणी केली होती.

## विद्याधामच्या तीन खेळाडूंची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या तीन खेळाडूंनी तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धे साठी आपली निवड निश्चित केली आहे. नुकत्याच परिक्रमा शैक्षणिक संकुल, काष्टी येथे श्रीगोंदा तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत विद्याधामच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत तीन सुवर्णपदकांची कमाई केली.

१४ वर्षे वयोगटात कु. राजलक्ष्मी महेश चव्हाण हिने ३३ किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत राजलक्ष्मीने प्रतिस्पर्ध्यांच्या डावावर अचूक प्रतिडाव करत प्रभावी खेळाचे प्रदर्शन केले. अंतिम फेरीत तिने प्रतिस्पर्धी खेळाडूला चितपट करत विजय मिळवला.

१७ वर्षे वयोगटातील ग्रीको-रोमन कुस्ती प्रकारात पै. साई राजू खोले याने ११० किलो वजनगटात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच १९ वर्षे वयोगटात पै. रोहन भास्कर मोटे याने १३० किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली.

या तिन्ही खेळाडूंची दि. १ ते ३ ऑक्टोबर रोजी नेवासा फाटा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे विद्याधामच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक श्री. संदीप घावटे ,महेश चव्हाण अमोल कातोरे यांचे मार्गदर्शन लाभले.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया,तालुका क्रीडा समिती अध्यक्ष सचिन जामदार, मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, पर्यवेक्षक एन. एस. डुंबरे, संजय देशपांडे, के. बी. काळे तसेच सर्व ग्रामस्थांनी तिन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले असून, आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## के. जी.कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात साजरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** के. जी. महाविद्यालय महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात डॉ स्वाती मुनोत यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यांनी सर्वसामान्य व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी केलेले कार्य आणि 'कमवा व शिका' या विचारधारेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.तसेच त्यांनी आपल्या मनोगतात कर्मवीर अण्णांच्या विचारांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत स्वावलंबन, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव जोपासावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिणी क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. स्नेहल बोरावके यांनी केले.यावेळी डॉ. प्रशांत खोपटीकर, प्रा. योगेश चाकोते, सौ. हर्षाली रासकर व विध्यार्थी उपस्थित होते.

## बाबुर्डी बेंद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिल्पा शरद चोभे बिनविरोध

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिल्पा शरद चोभे यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच मंदाताई सुनील खेंगट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियेत शिल्पा चोभे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



यावेळी माजी उपसरपंच भाऊसाहेब चोभे, वंदना भाऊसाहेब निमसे, हिराबाई अशोक चोभे, विजय वाळके आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका लावण्या डोन्टा यांनी निवड प्रक्रियेचे कामकाज पाहिले.

निवडीनंतर नूतन उपसरपंच शिल्पा चोभे यांचे ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी गावचे ज्येष्ठ नेते लहुकुमार चोभे, खंडेश्वर सहकारी संस्थेचे चेअरमन शरद चोभे, व्हाईस चेअरमन लहू कासार, अंबादास साठे, भाऊसाहेब निमसे, वैभव खेंगट, आण्णा चोभे, बाळासाहेब खेंगट, विकास चोभे, अक्षय खेंगट, आकाश चोभे, श्रीनाथ खेंगट, सागर चोभे मेजर आदी उपस्थित होते.

शिल्पा चोभे यांच्या बिनविरोध निवडीमुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला. नूतन उपसरपंच शिल्पा चोभे यांनी ग्रामस्थांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानत गावाच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका व्यक्त केली. उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल शिल्पा चोभे यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

## बेलवंडी येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलांचा संघ प्रथम, तर मुलींचा संघ उपविजेता!.

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, बेलवंडी येथे पार पडलेल्या खो-खो स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलांच्या खो-खो संघाने प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. याच स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने देखील उत्तम कामगिरी करत उपविजेतेपद मिळवले आहे.

या स्पर्धेत दोन्ही संघांतील खेळाडूंनी अत्यंत उत्कृष्ट व चमकदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात प्रतिस्पर्धी संघावर मात करत विजेतेपदावर आपले नाव कोरले आणि जिल्हास्तरीय स्पर्धेतील आपले स्थान पक्के केले. खेळाडूंच्या या यशामागे महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ सतीश चोरमले आणि कनिष्ठ विभाग क्रीडा संचालक डॉ महेश गिरमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या उत्कृष्ट प्रशिक्षणा मुळेच खेळाडूंना हे यश संपादन करता आले.



खेळाडूंच्या या दैदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे, प्राचार्य डॉ. सतिशचंद्र सूर्यवंशी संस्थेचे निरीक्षक सचिन लगड सर, युवा नेते दिग्विजय नागवडे, नागवडे कारखान्याच्या उपाध्यक्षा मेघाताई औटी, व नागवडे कारखान्याचे सर्व संचालक उपप्राचार्य कातोरे सर, आणि पर्यवेक्षक टकले सर तसेच श्रीगोंदा क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार सर यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले.

तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आणि परिसरातील क्रीडाप्रेमींनी खेळाडूंचे कौतुक करून त्यांना पुढील होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धे साठी आणि भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात वृक्षबंधन व गुठी कलम कार्यशाळा संपन्न

### अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव जागृती आणि सामाजिक बांधिलकीची भावना जागृत होते प्राचार्य डॉ प्रकाश साळवे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे खूप महत्त्वाची आहेत. युवकांनी केवळ वृक्षारोपण सोबतच वृक्षाचे संवर्धन , संगोपन केले पाहिजे. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव जागृती आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होते, असे विचार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी व्यक्त केले. ते महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात भूगोल विभागाने आयोजित केलेल्या वृक्ष रक्षाबंधन व गुठी कलम कार्यशाळेत अध्यक्ष म्हणून बोलत होते. या कार्यक्रमासाठी वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रा. कोमल बारवकर तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी वृक्ष संवर्धन व गुठी कलम या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल आणि उत्सुकतेची भावना निर्माण झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी वृक्षांना राखी बांधून वृक्ष हेच जीवन हा संदेश दिला. त्यानंतर गुठी कलम कलम कार्यशाळेचे प्रात्यक्षिक प्रात्यक्षिक घेण्यात आले. कु. श्वेता ओहळ यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बापू देवकर, डॉ. संदीप ससाणे, प्रा. राहुल ठवाळ, कु. मानसी जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कु. ऋतुजा मखरे, उर्मिला काकडे यांनी प्रभावीपणे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रम प्रसंगी डॉ. नितीन थोरात, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. राजेंद्र ठाकरे, डॉ. राजाराम कानडे, डॉ. राहुल गायकवाड, प्रा. रमेश थोरात, डॉ. देवेंद्र बहिरम, डॉ. सुप्रिया पवार, डॉ. हरिभाऊ वाघीरे, प्रा. सिद्धार्थ बर्वे, प्रा. वैशाली घोडके, प्रा. मनीषा रायकर आदी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्याकडून हजाराची लाच घेताना तलाठी रंगेहाथ

### वडवळी सज्जाचे तलाठी दिलीप कांबळे एसीबीच्या जाळ्यात; पैठण तहसील कार्यालय परिसरात कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** पैठण तालुक्यातील वडवळी सज्जाचे तलाठी दिलीप कांबळे यांना शेतकऱ्याकडून एक हजार रुपयांची लाच स्वीकारताना छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने शुक्रवारी (दि. २५) रंगेहाथ पकडले. पैठण तहसील कार्यालय परिसरात झालेल्या या कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली. वडवळी येथील ५० वर्षीय शेतकऱ्याच्या शेतजमिनीच्या वादासंदर्भातील कामासाठी सहकार्य करण्याच्या मोबदल्यात तलाठी दिलीप कांबळे यांनी लाचेची मागणी केल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती. लाच देण्याची इच्छा नसलेल्या शेतकऱ्याने याबाबत एसीबी कार्यालयाशी संपर्क साधला.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबी पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे एक हजार रुपयांची लाच स्वीकारताच तलाठी कांबळे यांना पथकाने रंगेहाथ ताब्यात घेतले. या प्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. एसीबीच्या या कारवाईमुळे महसूल विभागातील लाचखोरीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### नाशिक विभागीय फेडरेशनच्या वतीने रामकृष्ण अर्बन पतसंस्थेचा उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव



अहिल्यानगर - येथील एडीसीसी बँकेच्या स्व.आ. शिवाजीराव कर्डिले सभागृहात नाशिक विभागीय फेडरेशन, राज्य फेडरेशन व जिल्हा-तालुका फेडरेशनच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या सहकार्याने आयोजित पतसंस्थेचा कार्यशाळेत श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेड अहिल्यानगर या पतसंस्थेच्या सक्षम व उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा,सेवानिवृत्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे, सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे,अनिरुद्ध देवचक्के,राजीव गांधी पतसंस्थेचे अध्यक्ष उद्धव दुसुंगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार स्वीकारताना व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू,ज्येष्ठ संचालक लक्ष्मीकांत झंवर,संचालक विश्वनाथ कासट,संचालिका शोभा राठी,अनुरीता झगडे, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, ओ. एस. डी. कुमार आपटे, आणि प्रशांत टोणपे आदी उपस्थित होते. श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी लि.या संस्थेचा जिल्ह्यात चांगला नावलौकिक आहे.तसेच संस्थेचा ''अ'' वर्ग ऑडिट दर्जा आहे.एनपीए शून्य टक्के आहे.सर्व संचालक मंडळ अत्यंत पारदर्शी पणे कार्य करीत असल्याने संस्था प्रगतीपथावर आहे. संस्थेच्या आदर्श वाटचालीमुळे संस्थेच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन मागील वर्षी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन यांच्या वतीने पतसंस्था चळवळीत दिशादर्शक कार्याबद्दल मानाचा ''दीपस्तंभ पुरस्कार'' देऊन गोकर्ण महाबळेश्वर येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात संस्थेला गौरविण्यात आले होते.

### सहकार महर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालकपदी भागवत

अहिल्यानगर - सहकार महर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरध्यास श्रीकांत भागवत यांची संचालकपदी निवड झाल्याबद्दल पवन नागरी सहकारी पतसंस्थाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकारी व संचालकांनी श्रीकांत भागवत यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.सहकार क्षेत्रात संचालक म्हणून काम करताना सभासदांच्या हिताला प्राधान्य देत संस्थेच्या प्रगतीसाठी योगदान देणे महत्त्वाचे असते. श्रीकांत भागवत यांच्यावर सोपविण्यात आलेली ही नवीन जबाबदारी सहकार क्षेत्रातील त्यांच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाची मानली जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल समाजबांधव, मित्रपरिवार तसेच सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.यावेळी पवन नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक प्रसाद अर्जुनराव शिंदे, मनोज लक्ष्मण क्षिरसागर, अभय सदाशिव काळे, निशीकांत किशोर शिंदे, व्यंकटेश जोशी यांच्यासह संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते श्रीकांत भागवत यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संचालकपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर संस्थेच्या विकासासाठी तसेच सभासदांच्या हितासाठी चांगले काम करावे, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.

### अविनाश घुले यांच्या वाढदिवसानिमित्त गोशाळेत चारा वाटप

अहिल्यानगर - अहिल्यानगर ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष अविनाश तात्या घुले यांच्या वाढदिवसानिमित्त संघटनेच्या वतीने तसेच अहिल्यानगर फेडरेशनच्या माध्यमातून अरुणोदय गोशाळेत जनावरांना चारा वाटप करून वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला.यावेळी शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील प्रमुख उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून गोशाळेतील मुक्या प्राण्यांसाठी चारा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.कार्यक्रमास प्रजा चालक-मालक संघटनेचे उपाध्यक्ष भैय्या पठाण, सचिव विष्णू आंबेकर, अभय पतंगे, शाकीर पठाण, कलीम पठाण, अहमदनगर रिक्षा पंचायतचे उपाध्यक्ष व चांदणी चौक अध्यक्ष समीर कुरेशी, जावेद शेख, जालिंदर घोलप, गणेश हाकमोडे, सुधीर पानपाटील, जॉन लिली, अमोल बेरड, फूजेल कुरेशी तसेच अहमदनगर लक्झरी बस असोसिएशनचे अध्यक्ष हनुमंत दारकुंडे उपस्थित होते.अहिल्यानगर ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन यांच्या प्रेरणेने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी संघटनेचे सचिव अशोक औषिकर, गणेश आटोळे, नासिर खान, किशोर कुलट, सोपान दळवी, सुनील ठाकरे, चेतन वैराळ, सागर लांडे, किशोर खुडे, हेमंत कोकण, राजेश विधाते, संजय सहाणे, राकेश साळवे, वसंतराव गायकवाड, तोडमल दाजी, अन्वर शेख, मच्छिंद्र शिंदे, योगेश जावळे, तुषार रोकडे, शाहीद खान आदी उपस्थित होते.

# आर्य चाणक्यच्या १,९२६ जणांनी पाहिला 'ज्योती' लघुपट

**चित्रपटसृष्टी आणि भारतसृष्टी जोडणाऱ्या अभिनव उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त अजिंठा फिल्म सोसायटी, जळगाव यांच्या 'फिल्म्स कट्टा' उपक्रमांतर्गत 'ज्योती' या लघुपटाचे विशेष प्रदर्शन आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण येथे करण्यात आले. या उपक्रमात इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसह एकूण १ हजार ९२६ जणांनी लघुपटाचा अनुभव घेतला.

आर्य चाणक्य विद्यामंदिराच्या संपूर्ण संकुलातील १ हजार ८७४ विद्यार्थी, ४४ शिक्षक, ४ कर्मचारी आणि ४ पदाधिकारी, सभासद व पालक यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवनकार्याची तसेच सामाजिक परिवर्तनाच्या विचारांची ओळख कलात्मक माध्यमातून करून देणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मालाणी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज चव्हाण, मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, माध्यमिक मुख्याध्यापिका ज्योती जोशी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख उज्वला कुटे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या मनावर सामाजिक मूल्यांचे संस्कार करणारा हा लघुपट असल्याने भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना हा लघुपट दाखविण्याचा आग्रह केला होता. शालेय समिती अध्यक्ष नंदकिशोर मालाणी यांनी उपक्रमासाठी विशेष आर्थिक सहकार्य केले तसेच संपूर्ण वेळ उपस्थित राहून सहभाग घेतला.

यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. चित्रपटसृष्टी आणि भारतसृष्टी यांना जोडणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना इतिहास, समाजसुधारणा आणि भारतीय मूल्यांकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळाली, अशी भावना व्यक्त करण्यात आली. आर्य चाणक्य विद्यामंदिराच्या वतीने अशा आशयपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ज्ञानासोबतच सामाजिक व सांस्कृतिक जाणीवा समृद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या 'वर्षा' शासकीय निवासस्थानी विधानपरिषद सभापती ना प्रा राम शिंदे यांनी श्री गणरायाची मनोभावे आरती केली व मुख्यमंत्री महोदयांसमवेत दर्शन घेतले. यावेळी रोहन मांडे उपस्थित होते.

## श्रीरामाच्या भव्य मूर्तीतून गणेशोत्सवाचा आगळावेगळा संदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केडगाव येथील एकनाथनगर परिसरातील योद्धा युवा प्रतिष्ठानच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येत असून, गणेश मंडळाच्या परिसरात श्रीरामाची भव्य मूर्ती साकारून सामाजिक व सांस्कृतिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजाला एकत्र आणणारा आणि संस्कार व एकतेचा संदेश देणारा उत्सव ठरावा, या उद्देशाने प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

संदीप उद्योग समूहाचे सचिन आबा कोतकर यांच्या आयोजनातून महाप्रसादाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी भूषण गुंड, सागर सतपुते, सौ. सविता कराळे यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम मंडळांकडून होत असून, अशा उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने योद्धा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रताप तनपुरे यांनी मान्यवरांचा सत्कार करून त्यांच्याशी संवाद साधला.

# शिवराजे प्रतिष्ठाण वतीने आरोग्य शिबीर संपन्न



(छाया : सतिष जगताप)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार** – शिवराजे प्रतिष्ठानच्या वतीने भव्य आरोग्य तपासणी शिबीर संपन्न शेकडो नागरिकांनी घेतला लाभ सामाजिक बांधिलकीच्या उद्देशातून आणि सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शिवराजे प्रतिष्ठानच्या खरवंडी कासार वतीने आयोजित करण्यात आलेले भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबीर नुकतेच उत्साहात संपन्न झाले. या शिबिरामध्ये परिसरातील शेकडो नागरिकांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.शिबिराचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांचा हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नामवंत डॉक्टरांचे पथक उपस्थित होते.तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मोफत औषधोपचारया भव्य शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली.

यामध्ये प्रामुख्याने खालील तपासण्यांचा समावेश होता:रक्तदाब ( ) व मधुमेह () तपासणीहृदयविकार, अस्थिरोग आणि नेत्र तपासणीमहिला व बालकांसाठी विशेष आरोग्य समुपदेशनतपासणीनंतर गरजू रुग्णांना प्रतिष्ठानच्या वतीने मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले. तसेच ज्या रुग्णांना पुढील उपचारांची गरज आहे, त्यांना योग्य मार्गदर्शन व पुढील उपचारांसाठी सवलत देण्याचे आश्वासन वैद्यकीय पथकाकडून देण्यात आले.नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसादसध्याच्या धावपळीच्या युगात आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष टाळण्यासाठी शिवराजे प्रतिष्ठानने उचललेले हे पाऊल अतिशय कौतुकास्पद असल्याचे मत शिबिरात आलेल्या नागरिकांनी व्यक्त केले. सकाळपासूनच शिबिराच्या ठिकाणी नागरिकांनी तपासणीसाठी मोठी गर्दी केली होती.प्रतिष्ठानचा संकल्प''गोरगरीब व गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिवराजे प्रतिष्ठान नेहमीच अशा सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांमध्ये अग्रेसर राहील आणि भविष्यातही असे आरोग्य शिबीर सातत्याने राबवले जातील,'' असा विश्वास प्रतिष्ठानच्या मुख्य आयोजकांनी याप्रसंगी बोलताना दिला.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी शिवराजे प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी, कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक तरुण मंडळांनी विशेष परिश्रम घेतले. प्राथमिक आरोग्य केंद्र खरवंडी कासार आरोग्य वैद्यकीय अधिकारी आदेश कळके, जयश्री कराड, अर्चना गुगळे बाळासाहेब घुले लॅब टेक्निशन,अजय आव्हाड आरोग्य सहाय्यक वाल्मिक बांगर आरोग्य सेवक हर्षद बोढाले आरोग्य सेवक प्रा. आरोग्य कर्मचारी सहभाग घेत रुग्ण सेवा देत औषधाचे वाटप करण्यात आले वैदकिय अधिकारी आदेश कळके यांच्या हस्ते गणरायाची आरती संपन्न झाली यांचा सन्मान प्रतिष्ठाणचे संदिप देशमुख संतोष केळगंद्रे मुकुंद हुलजुते यांनी सन्मान केला शिवराज प्रतिष्ठाण खरवंडी कासार दर वर्षी सामाजिक उपक्रम राबवत असतात या कार्यांचे परिसरातुन कौतुक होत आहे आरोग्य शिबीर प्रसंगी सरपंच प्रदीप पाटील यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुण कार्यक्रमाची सुरवात झाली यावेळी शिवराजे प्रतिष्ठाण अध्यक्ष मयूर जायभाये आदी सदस्य मंडळ यांनी कार्यक्रम सपन्न होण्यासाठी सहकार्य केले.

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री मार्कंडेय शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री मार्कंडेय शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी सौ. धनश्रीताई विखे,उपमहापौर धनजंय जाधव,भाजपा गटनेत्या शारदा ढवण, नगरसेवक महेश लोंढे, दत्ता गाडळकर, नगरसेविका शितल ढोणे, जालिंदर कोतकर, अमोल निस्ताने,रूदेश अंबाडे, मुकुल गंधे, अभिजीत बोरूडे, विकी वाघ, महेंद्र बिज्जा, मनोज लोंढे, रोहन सानप, पुरूषोत्तम सब्बन,सिदम एस. बाळकृष्ण बालया,अशोक सब्बन, शंकरराव येमूल आदी उपस्थित होते.

धनश्री विखे म्हणाल्या विद्यार्थ्यांकडून आईवडीलांना फक्त भरपूर अभ्यास करा आपल्या पायावर उभे राहावे ही अपेक्षा असते.स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कष्ट घ्या मस्ती करा ,खेळा पण अभ्यास करा.आयुष्यात उददीष्ट ठरवा त्यामध्ये चार पाच पर्याय ठेवा कोणत्या गोष्टीकरीता किती कष्ट घ्यावे लागतील यांचा आतापासूनच अभ्यास करा.ध्येय पूर्ण करण्यासाठी मागदर्शक शोधा प्रत्येकात सुप्त गुण असतो तो शोधा मोठ्या शाळेत गेल्यानेच मोठे होतो असे नाही. जो जिद्दीने ठरवतो तो यशस्वी होतो.टिव्ही मोबाईल मन अस्थिर करते.तंत्रज्ञानाचा वापर आपण कसा करतो त्याला महत्त्व आहे. मोठ्यांची चरीत्रे अभ्यासा यावेळी त्यांनी पद्मश्री विखेपाटील, डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांची उदाहरणे देत समजून सांगितले. झाड फक्त लावून तर ती कशी जगतील याकडे लक्ष द्या जो वर्षभर झाड जगवेल त्याला बक्षीस मिळणार असल्याचे सांगितले.

धनजंय जाधव म्हणाले पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील व सुजय विखे पाटील हे नेहमीच पाठीशी असतात विखे कुटुंबीय प्रत्येक क्षेत्रात मदत करतात.विदयाथ्यानी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून नये विद्यार्थी हे आईवडीलापेक्षा शिक्षकांचे जास्त ऐकतात. डॉ. राधाकृष्ण विखे ग्रीन सिटी मोहिमेला सुरुवात केली आहे. ग्लोबल वार्मिंग होत आहे डॉ .सुजय विखे व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या शहरात दीड लाख झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. शाळेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

## एलसीबीचा छापा; १२ किलो गांजाची झाडे जप्त

**पाथर्डीत कपाशीच्या शेतात गांजाची लागवड**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाथर्डी येथील जांभळी गावच्या शिवारातील कपाशीच्या शेतातील गांजाच्या लागवडीवर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकला. या कारवाईत ११.६०० किलो गांज्याच्या झाडासह आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार विकास साळवे, गणेश लोंढे, भगवान सानप, बाळासाहेब खेडकर, वंदना मोढवे यांच्या पथकाने ही कारवाई केली. गुन्हे शाखेच्या पथकाने पाथर्डी पोलिसांसह जांभळी गावच्या शिवारातील शेतीमधील कपाशीच्या पिकाची पंचासमक्ष पाहणी केली. कपाशीच्या पिकामध्ये गांजाची पाच लहान मोठी झाडे मिळून आली. किशोर बन्सी जायभाये (वय ३९, रा.येळी, ता.पाथर्डी) यास ताब्यात घेतले. ताब्यातील आरोपीच्या शेतामधून २ लाख ३२ हजार रूपये किंमतीची ११.६०० किलो वजनाची गांज्याची एकूण पाच लहान मोठी झाडे जप्त करण्यात आली. त्याच्या विरूध्द पाथर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किशोर बन्सी जायभाये हा सराईत गुन्हेगार असून त्यास उपविभागीय दंडाधिकारी, पाथर्डी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये दिनांक ३०/०१/२०२४ रोजीपासून २ वर्षाकरीता अहिल्यानगर जिल्हयामधून व बीड जिल्हयातील शिरूर व आष्टी तालुक्यातून हद्दपार केले होते.

# सभासद व ठेवीदार यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे संस्था उर्जित अवस्थेत - चेअरमन सुनिल ढवळे

**समता ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेची २८ वी वार्षिक सभा उत्साहात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बेलवंडी येथील समता ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन सुनील ढवळे होते.

अध्यक्षीय भाषणात सुनील ढवळे म्हणाले की, ''दहा वर्षांपूर्वी संस्था अत्यंत बिकट आणि डबघाईच्या स्थितीत होती. मात्र संचालक मंडळाचे प्रामाणिक प्रयत्न तसेच सभासद व ठेवीदारांनी दाखविलेल्या विश्वासामुळे आज संस्था बळकट व ऊर्जित अवस्थेत उभी आहे.'' संस्थेच्या आर्थिक प्रगतीची माहिती देताना त्यांनी सांगितले की, सध्या संस्थेकडे २ कोटी २६ लाख रुपयांच्या ठेवी असून, १ कोटी ८५ लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. यंदा संस्थेला २ लाख ४४ हजार रुपयांचा नफा झाला आहे. संस्थेच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत 'दीपस्तंभ' आणि 'बँको' हे दोन राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याचेही त्यांनी सांगितले.



**स्थानिक पंतसंस्था या सातत्याने विश्वासाने कामकाज करत आहेत बाहेर अनेक पंतसंस्था आल्या व पैसे गोळा करून पोबारा झाल्या त्यामुळे सभासद , ठेवीदार व कर्जदार यांनी नेहमीच आर्थिक व्यवहार करताना सारासार विचार करावा असे आव्हान व्हाईस चेअरमन अश्रुद्दिन शेख यांनी केले.**

यावेळी ज्ञानदेव हिरवे, ऋषिकेश शेलार, सुभाष काळाने, बाळासाहेब ढवळे, विजय काळाने, हौसराव लाढाणे, सोपान हिरवे, संतोष शिंदे, किसन वऱ्हाडे, कैलास राऊत, नामदेव साळवे, त्रिंबक मुठाळ, मुरलीधर ढवळे आदींनी मनोगत व्यक्त करून संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

सभेस व्हाईस चेअरमन अश्रुद्दिन शेख, संचालक सुनील धनवडे, सुभाष पोखरणा, सुनील खेडकर, हिरामण लाडाने, गणेश शेलार, आप्पा आरकस, प्रमोद पवार, ज्ञानेश्वर गोरे, सुवर्णा लांडे, कांचन घोडेकर, संतोष शेलार, अंकुश वाळके, पारस कोठारी यांच्यासह सभासद व ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत जयश्री मार्केट परिवारातर्फे गणेशभक्तांना पुलाव प्रसादाचे वाटप

### योगेश (गुड्डू) मुनोत यांच्यासारख्या कार्यकर्त्याची उणीव नेहमीच जाणवेल : रामब्रिज गुप्ता



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर लाडक्या गणरायाला अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप देण्यात आला. नगर शहरात काढण्यात आलेल्या गणेश विसर्जन मिरवणुकीवेळी नवीपेठ येथे जयश्री मार्केट, मुनोत व गुप्ता परिवाराच्या वतीने गणेशभक्तांना पुलाव प्रसादाचे वाटप करण्यात आले. माळीवाडा देवस्थानचा मानाचा पहिला गणपती नवीपेठेत आल्यानंतर मुनोत व गुप्ता परिवाराने गणपतीची आरती केली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रसाद वाटपाचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, रामब्रिज गुप्ता, अशोक कोठारी, अमित गुप्ता, अंकुश गुप्ता, रोहित गुप्ता, रोनक मुनोत, राज मुनोत, रितीक मुनोत, सागर गुप्ता, शरद मुथा, हेमंत मुथा, सचिन कोठारी, संतोष चंगेडे (जग्गू), अमित गांधी, मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, बाबालाल गांधी, नितीन मुनोत, प्रितेश मुनोत आदी उपस्थित होते.

रामब्रिज गुप्ता म्हणाले, दरवर्षी गणेश विसर्जन मिरवणुकीवेळी नवीपेठ येथे भाविक मोठ्या संख्येने येत असतात. त्यांना मुनोत, गुप्ता परिवार तसेच जय आनंद महावीर युवक मंडळाचे सदस्य पुलाव प्रसाद देतात. मंडळाचे युवा कार्यकर्ते योगेश (गुड्डु) मुनोत दरवर्षी प्रसाद वाटपासाठी परिश्रम घ्यायचे. आज ते आपल्यात नसले तरी त्यांची स्मृती चिरंतन आहे. विशाल गणपतीवर त्यांची नितांत श्रद्धा होती. नित्यनेमाने ते दर्शनासाठी यायचे. त्यांची उणीव सर्वांनाच जाणवत आहे.

शैलेश मुनोत म्हणाले, नगर शहरातील गणपती विसर्जन मिरवणुक पाहण्यासाठी गणेशभक्त मोठी गर्दी करतात. शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातूनही भाविक येत असतात. त्यांना अल्पोपहार मिळावा आणि गणेशोत्सवाचा आनंद व्दिगुणित करावा यासाठी पुलाव प्रसादाचे वाटप करण्यात येते. दरवर्षी माझे बंधू योगेश मुनोत उत्साहात प्रसादाची व्यवस्था करायचे. ते आपल्यात नाहीत तरी त्यांची परंपरा कायम ठेवली आहे. भाविकांनी श्रध्देने या प्रसादाचा लाभ घेतला

शरद मुथा म्हणाले की, गणेशाची दहा दिवस पूजा केल्यानंतर लाडक्या बाप्पाला निरोप देताना प्रत्येक जण भावनिक होतो. नगरमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी हजारो भाविक येत असतात. या भाविकांसाठी मागील २१ वर्षांपासून नवी पेठ येथे प्रसादाची व्यवस्था करण्यात येते. मुनोत, गुप्ता परिवार दरवर्षी श्रद्धेने प्रसाद वाटप करतात हे पाहून आनंद होतो. आमचे परममित्र गुड्डू मुनोत दरवर्षी पुढाकार घेऊन प्रसादाची व्यवस्था करायचा, त्यांची कमी प्रकर्षाने जाणवते. आबालवृद्ध भाविकांनी मोठ्या संख्येने या महाप्रसादाचा लाभ घेतला.

# गणेशोत्सवात एकल महिलांच्या हस्ते अनेक गावांमध्ये श्रीगणेशाचीआरती

### साऊ एकल महिला समितीचा स्तुत्य उपक्रम





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये एकल महिलांनाही समान सन्मान व सहभागाची संधी देण्यात यावी, असे आवाहन साऊ एकल महिला समिती, महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख सामाजिक कार्यकर्ते श्री हेरंब कुलकर्णी, श्री अशोक कुटे, श्री प्रकाश जोंधळे यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्यावतीने करण्यात आले होते.

आपल्या समाजात धार्मिक कार्यक्रमांमध्ये अनेकदा एकल महिलांना दूर ठेवले जाते, तसेच सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांना अपेक्षित स्थान दिले जात नाही. ही सामाजिक मानसिकता बदलण्याची गरज असून, एकल महिलांना सन्मानाने समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

गणेशोत्सवाच्या काळात विविध प्रतिष्ठित व्यक्तींच्या हस्ते दररोज गणपतीची आरती केली जाते. त्याच धर्तीवर गणेशोत्सवातील एक दिवस एकल महिलांच्या हस्ते गणपतीची आरती आयोजित करावी, अशी विनंती अशोक कुटे,कारभारी गरड,सौ.प्रतिभा कुलकर्णी, सौ.संगीता मालकर,मिलिंदकुमार साळवे,प्रकाश जोंधळे, प्रथमेश सोनवणे, सुजाता गुंजाळ, श्रीकांत बिडवे यांचेसह समितीच्या कार्यकर्त्यांनी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना केली होती.

या विनंतीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यात जयश्री टुपके, स्वाती टोरपे, रेखा पाळंदे, सुनिता कदम, किर्ती दिघे,यांचे हस्ते श्रीगणेशाची आरती करण्यात आली याशिवाय अकोले, नगर कोपरगाव, राहाता, संगमनेर आणि शेवगाव तालुक्यामध्ये अनेक गणेश मंडळांनी एकल महिलांच्या हस्ते आरती करून नवीन आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

# कृषी विद्यापिठ संगीत मैफलीत पवन नाईक यांचे वरूण राजाला साकडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** येथिल सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठाने नादब्रह्म संगीतालय, अहिल्यानगर प्रस्तुत व पवन श्रीकांत नाईक (आंतरराष्ट्रीय शास्त्रीय, सुगम व सुफी गायक) निर्मित ''गाणी तुमची आमची – सुफी दरबार'' अशी बहारदार मराठी, हिंदी, पंजाबी, ऊर्दू व ब्रज भाषेतील प्रसिद्ध गीतांची मैफल आयोजित केली होती. बळी राजासाठी वरूण देवता (झुले लाल) यांच्यावर आधारीत व भारतीय संस्कृतीतील विविध देवी देवतांना आवाहनात्मक सुख समृद्धीसाठी वैशिष्ट्यपूर्ण रचनांचा या संगीत मैफलीत जाणीवपुर्वक समावेश करण्यात आला होता.

संगीत मैफलीत मुख्य गायक – पवन श्रीकांत नाईक, गायिका – सरोज पालडीया, कल्याण मुरकुटे व पंकज नाईक (संवादिनी), कुलदीप चव्हाण (बेंजो), स्मिता राणा (सतार), सालोमन पेहेलवान (व्हायोलिन), प्रणव देशपांडे (सिंथेसायझर), सुरज शिंदे (तबला), आदित्य मोरे (ड्रम), नेगीन काजेमी (डफ) तेहरान – ईरान, सहगायक – निनाद पारखी, श्रेयस शीत्रे, पवन तळेकर, मूलांशु परदेशी, अथर्व कोरडे, ऋषी त्रिवेदी, आश्लेषा मोरे, जयंत पाठक व विजय जाधव. सूत्रसंचालन – दिप्ती शुक्रे व संकेत गांधी तसेच तंत्रज्ञांमध्ये ध्वनी व्यवस्था – रवी जाधव व प्रकाश योजना – सागर चव्हाण यांचा विशेष सहभाग होता.

पवन श्रीकांत नाईक यांनी मैफलिची सुरूवात गणेश वंदना – गणपती बाप्पा के दरबार याने केली, नंतर अनुक्रमे शिवस्तुती – खंडेरायाच्या लग्नाला, लोक साहित्यातील पठ्ठे बापूराव यांनी रचलेली कृष्ण भक्तिपर गवळण – दहिवाली मी गवळ्याची नार या रचना पुर्वार्धात सादर केल्या.

मैफलिच्या उत्तरार्धात सुफी रचनांचा सहभाग होता. सासों की माला, पग़ घुंगरू बांध मिरा नाची थी (सरगम), सेव्हण वाला पीर झुले लाल, किन्ना सोणा तैणू रबने बनाया, तेरे वाज्जो दिल दिया मेहरम, जूर्म सिर्फ ईतना है व मेरे रश्के क़मर या प्रसिद्ध रचना सादर केल्या. मूलांशु परदेशी याने ''आली भवानी राउळात'' हि देवी स्तुती व सरोज पालडीया यांच्या बोल आलाप व तानांनी मैफलीत खास रंगत भरली.

याप्रसंगी आंतरराष्ट्रीय गायक श्री पवन नाईक यांचे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार व स्वागत केले. याप्रसंगी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके, तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, सहाय्यक कुलसचिव श्री व्ही. टी. पाटील, डॉ. अधीर आहेर,डॉ. भगवान देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

# मोरया ग्रुपच्या गणरायाला भावपूर्ण निरोप; ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन मिरवणूक

### महिला, युवकांसह सर्व सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** मोरया ग्रुपच्या वतीने यंदा सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आलेल्या गणेशोत्सवाची सांगता आज गणरायाच्या विसर्जनाने झाली. पारंपरिक वेशभूषेत महिला, युवक तसेच मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने विसर्जन मिरवणुकीला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले.

गणरायाच्या मूर्तीची आकर्षक सजावट करून ट्रॅक्टरवरून विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. महिला सदस्यांनी पारंपरिक साड्यांमध्ये सहभाग नोंदवत मिरवणुकीची शोभा वाढविली. युवक व पुरुष सदस्यांनीही उत्साहात सहभाग घेतला.

यंदाच्या गणेशोत्सवात मोरया ग्रुपच्या वतीने महिला, बालक, युवक व ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य जनजागृती, शैक्षणिक मार्गदर्शन, मनोरंजनात्मक खेळ, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम, वृक्षारोपण, स्वच्छता जनजागृती तसेच व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला. त्यामुळे धार्मिक उत्सवासोबत सामाजिक बांधिलकीची जपणूक करण्यात आली. विसर्जनापूर्वी गणरायाची आरती करण्यात आली. यावेळी मंडळातील सदस्यांनी एकत्र येत पुढील वर्षीही सामाजिक उपक्रमांची ही परंपरा कायम ठेवण्याचा संकल्प केला. संपूर्ण उत्सव काळात सर्व सदस्यांनी एकजुटीने काम केल्याने कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला. या वेळी मंडळाचे पदाधिकारी, महिला सदस्य, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारनेर ग्रामीण पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

### सभासदांना १२ टक्के लाभांश देणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**पारनेर–** पारनेर ग्रामीण पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २६/०९/२०२६ रोजी संस्थापक चेअरमन तथा पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या अध्यक्षतेखाली मनकर्णिका लॉन्स, पारनेर येथे संपन्न झाली. यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन सुरेश बोरुडे सर, संचालक बाळासाहेब सोबले, रखमाजी कापसे सर, लक्ष्मण डेरे, मयूर गांधी, अर्जुन गाजरे, राजेंद्र औटी, कृष्णा उमाप, सुभाष राठोड, दिलीप दाते, सुनील गाडगे, सौ. सुंदा दाते व सौ. आशा तराळ तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात उपस्थित होते.

> **संस्थेचे २३ वर्षांच्या कालावधीत मार्च २०२६ अखेर २५१ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झालेल्या आहेत. हे सभासदांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. संस्थेच्या ठेवी मार्च २०२७ अखेर ३०० कोटींचा टप्पा पार करणार असल्याचा विश्वास आहे.**
>
> **सुरेश बोरुडे सर**, व्हा. चेअरमन

सभेच्या सुरुवातीला महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, शिक्षण महर्षी डॉ. वाय. पाटील व अहवाल सालातील दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सेवानिवृत्त एसीपी डॉ. सिताराम कोल्हे, ए.टी.सी.सी. बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, मा. जि.प. सदस्य वसंतराव चेडे, मा उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, मा. संचालक विठ्ठलराव औटी, मा. सरपंच जयसिंग मापारी यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्यानंतर संस्थेला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात ३ कोटी ३ लाख १२ हजार ६१७ निव्वळ नफा व ऑडिट वर्ग अ मिळाल्याबद्दल मा. चेअरमन काशिनाथ दाते सर यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना सांगितले.

संस्थेची बँक गुंतवणूक १०४ कोटी असून, स्थावर मालमत्ता ३ कोटी ५४ लाख आहे. संस्थेमार्फत सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. सभासदांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व व्यवसायासाठी १७५ कोटी रुपये कर्ज वितरित केले आहे.

संस्थेचे अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई जिल्हा कार्यक्षेत्र असून संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, बेलवंडीफाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा, सुपा, कामोठे, अहिल्यानगर, वनकुटे, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा सुरू आहेत, संस्थेचे चेअरमन काशिनाथ दाते यांनी सांगितले.

संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे, खडकवाडी, आळेफाटा, शिरूर व सुपा येथे स्वमालकीच्या इमारती आहेत. संस्थेने पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, सुपा, बेलवंडीफाटा, जामगाव, ढवळपुरी येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. व सभा खेळीमेळीत संपन्न झाली. सभेचे सूत्रसंचालन रखमाजी कापसे सर यांनी केले. व्हाईस चेअरमन सुरेश बोरुडे सर यांनी आभार मानले. यावेळी सभासद व कर्मचारी उपस्थित होते. संस्थेच्या सभासदांना संस्थेमार्फत मिष्टान्न भोजन सभा संपल्यानंतर देण्यात आले.

## (पान १ वरून) शहराचा सांस्कृतिक व पारंपरिक वारसा असाच जोपासावा – आ. संग्राम जगताप

मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराला अध्यात्मिक आणि धार्मिकतेची मोठी परंपरा लाभली आहे. हा सांस्कृतिक व पारंपरिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आपले सण-उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरे केले पाहिजेत. श्री विशाल गणपती हे शहराचे ग्रामदैवत असून लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे.

गणरायाच्या आशीर्वादाने प्रत्येकाच्या कुटुंबात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना करत त्यांनी गणेशभक्तांना शुभेच्छा दिल्या. दहा दिवस मोठ्या भक्तिभावाने गणरायाची पूजा-अर्चा केल्यानंतर विसर्जनाच्या वेळी प्रत्येकाचे अंतःकरण भरून येते. गणरायाला निरोप देताना भक्तिभावाचे वातावरण निर्माण होते, असेही ते म्हणाले.

## मातोश्री वृद्धाश्रमात रक्तरंजित थरार

इतरांवर हल्ला केल्याचे सीसीटीव्हीमध्ये रेकॉर्ड झाले आहे. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून मुढील तपास एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात करत आहेत.

हल्ल्यामागचे कारण अद्याप स्पष्ट नाही

या हल्ल्यामागे नेमके कारण काय होते, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज, घटनाक्रम आणि संबंधित व्यक्तींची माहिती तपासली जात आहे. घटना नेमक्या कोणत्या कारणातून घडली, याचा तपास सुरू आहे. अश्शी माहिती पोलिस उपअधीक्षक शिरीष वमणे यांनी दिली. दरम्यान, या घटनेमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात खळबळ उडाली असून, वृद्धाश्रमातील सुरक्षाव्यवस्थेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलिसांच्या तपासातून हल्ल्याचे नेमके कारण आणि घटनेचा संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट होणार आहे. महिलांवर हल्ला नाही मातोश्री वृद्धाश्रमात एकूण ३० जण होते. त्यामध्ये १७ पुरुष व १३ महिला होत्या. राजू घुले याने केलेल्या हल्ल्यात दोघांचा मृत्यू झाला आहे. तर सहा जणांवर जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हल्लेखोराने वृद्धाश्रमातील कोणत्याही महिलेवर हल्ला केला नाही.

## दुष्काळाच्या यादीत पैठण तालुका; आ. भुमरे यांच्या पाठपुराव्याला यश

मोठा फटका बसला. त्यामुळे पैठण तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर आमदार विलास बापू भुमरे यांनी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करून पैठण तालुक्याची दुष्काळी परिस्थिती प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. अखेर पहिल्याच यादीत पैठणचा समावेश झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.दुष्काळग्रस्त यादीतील समावेशामुळे शासनाच्या नियमानुसार मिळणाऱ्या विविध सवलती व मदतीचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाबद्दल आमदार विलास बापू भुमरे यांचे शेतकरी व नागरिकांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेटच्या ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व विषयांना सभासदांची मंजुरी

जलद सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेच्या दैनंदिन कामकाजातील नोंदी व प्रशासकीय प्रक्रिया हळूहळू डिजिटल स्वरूपात आणण्यात येत आहेत. भविष्यात संस्थेचे कामकाज अधिक आधुनिक, कार्यक्षम व तंत्रज्ञानाधारित करण्याचा संस्थेचा प्रयत्न राहणार आहे. सभेचे संपूर्ण कामकाज संस्थेचे व्यवस्थापक श्री. दिलीप हस्तीमल कटारिया यांनी नियोजनबद्ध पद्धतीने सांभाळले. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी तसेच सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल संस्थेचे व्हा. चेअरमन श्री. निलेश नंदकुमार मेहेर व संचालक श्री. संतोष कनकमल बोरा यांनी उपस्थित सर्व सभासद, मान्यवर व सहकाऱ्यांचे आभार मानले.

सभेस संस्थेचे विद्यमान चेअरमन श्री. अरविंद माणकलाल गुंदेचा, व्हा. चेअरमन श्री. निलेश नंदकुमार मेहेर, संचालक श्री. संतोष माणकचंद बोथरा, श्री. संतोष कनकमल बोरा, श्री. मेहूल कुंतीलाल भंडारी, श्री. नितीन सुभाषलाल पटवा, श्री. आनंद प्रकाशलाल देसर्डा, श्री. सुनिल शांतीलाल मुनोत, संचालिका श्रीमती प्रमिलाबाई हेमराज बोरा, सौ. शितल महेंद्र छाजेड, तसेच स्वी. संचालक श्री. सतिष बन्सीलाल बोरा, श्री. सुनित रमेशलाल मुनोत, श्री. नरेश फुलचंद गांधी, श्री. प्रितम वसंतलाल गांधी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यावरील सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी देत संस्थेच्या पुढील वाटचालीस सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. सभासदांच्या सूचना, मार्गदर्शन आणि सहकार्याच्या माध्यमातून औद्योगिक वसाहतीचा विकास अधिक वेगाने साध्य करून संस्था औद्योगिक प्रगती, आधुनिक व्यवस्थापन, डिजिटलायझेशन आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून एक आदर्श औद्योगिक संस्था म्हणून पुढे नेण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## छावणीतील प्रश्नांना आता 'डेडलाइन'

देखभाल व्यवस्था उभारण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

संरक्षण विभागाच्या हद्दीतील इंदिरानगर परिसरातील नागरिकांना वीज आणि अन्य मूलभूत सुविधांच्या समस्यांना अनेक वर्षांपासून सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. या परिसराची संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी स्वतंत्र दौरा आयोजित करण्याच्या सूचना खासदार लंके यांनी दिल्या.

छावणी परिषद बसस्थानकाची सध्याची दुरवस्था आणि परिसरात वाढलेली झाडे-झुडपे याबाबतही चर्चा झाली. जागेचा योग्य वापर होत नसल्याने एसटी महामंडळाशी समन्वय साधून परिसराची स्वच्छता करावी आणि बसस्थानक पुन्हा वापरात आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले. छावणी परिषद रुग्णालयात नागरिकांना अपेक्षित आरोग्य सुविधा मिळत नसल्याचा मुद्दाही बैठकीत गंभीरपणे मांडण्यात आला. औषधांचा नियमित पुरवठा, आवश्यक मनुष्यबळ आणि उपलब्ध आरोग्य सुविधा यांचा आढावा घेऊन रुग्णालयाची सेवा अधिक सक्षम करण्याच्या सूचना करण्यात आल्या. नागरिकांच्या प्रश्नांसाठी निधी अथवा प्रशासकीय अडचण असल्यास संबंधित प्रस्ताव सादर करावेत आणि शासनस्तरावर त्याचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी स्वीकारण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

चैतन्य मंगल कार्यालयाच्या दुरवस्थेबरोबरच वाढलेल्या भाडेदराचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. कार्यालयाची आवश्यक दुरुस्ती करून सर्वसामान्य नागरिकांना परवडेल अशा पद्धतीने सुविधा उपलब्ध कराव्यात. कार्यालय भाडेतत्त्वावर देताना पारदर्शक प्रक्रिया आणि योग्य दर निश्चित करावेत, अशा सूचना देण्यात आल्या. छावणी परिषद हद्दीतील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी फुटबॉल मैदानाचा विकास करून ते आवश्यक क्रीडा सुविधांनी सुसज्ज करण्याच्या सूचना करण्यात आल्या. स्थानिक युवकांना क्रीडा क्षेत्रात अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

## श्री सिद्धेश्वर बाल मंडळाचा 'विकासाचे महामेरु सुजयदादा' हा लक्षवेधी देखावा!

कार्यालयाची सुंदर प्रतिकृती उभारण्यात आली आहे. तसेच काँक्रीट रस्ते, नवीन उद्याने, पाणीपुरवठा, शिक्षण सुविधा आणि नागरी विकास अशा विविध विकासकामांचे दिशादर्शक फलकही या देखाव्यात लक्ष वेधून घेतात.- पायाभूत सुविधांसोबतच पर्यावरण संवर्धनावरही या देखाव्यात भर देण्यात आला आहे. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वतीने शहरात राबविण्यात येत असलेल्या ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहीम या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचाही यात विशेष समावेश करण्यात आला आहे. देखाव्याच्या उजव्या बाजूला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि ॲड. धनंजय जाधव यांच्या छायाचित्रांसह ही ग्रीन सिटी मोहीम ठळकपणे दर्शविण्यात आली आहे. देखाव्याच्या तळाशी ''समृद्ध अहिल्यानगर, विकसित महाराष्ट्र'' असा संदेश देणारा फलक लावण्यात आला आहे. शहरवासीयांसाठी हा देखावा विशेष आकर्षण ठरत असून, यातून जिल्ह्याच्या विकासाची आणि प्रगतीची नवी दिशा अधोरेखित करण्यात आली आहे.

## खासदारांना स्वीडन कुठं ते माहित नाही ! दोन वर्षांत १ रुपयांचा निधी आणू शकले नाही

व्यक्तिगत असं दोन वेगळं आयुष्य असतं. राजकीय आयुष्यात पक्ष असतात, पक्षाच्या भूमिका असतात आणि आरोप-प्रत्यारोपही होतात. मात्र, व्यक्तिगत आयुष्याची एक मर्यादा असते.गेल्या काही वर्षांत खासदारांवर अनेक आरोप झाले. महिलांशी संबंधित आरोप झाले, कॉल रेकॉर्डिंगही समोर आली. मात्र, मी कधीही त्या मुद्द्यांचा राजकीय फायदा घेऊन भाष्य केलेलं नाही. माझी एकही बाईट दाखवा, ज्यामध्ये मी खासदारांच्या व्यक्तिगत आयुष्यावर किंवा चारित्र्यावर भाष्य केलं आहे. कारण व्यक्तिगत आयुष्यात कोणाच्याही जाणं योग्य नाही, हा सुसंस्कृतपणा महाराष्ट्रातील प्रत्येक पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी जपला आहे आणि तोच सुसंस्कृतपणा जपण्याचा मी प्रयत्न करतोय. मात्र, ज्यांना समाजाच्या आणि जिल्ह्याच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी मुद्दे नाहीत, ते दुसऱ्यांच्या कौटुंबिक विषयांना राजकीय मुद्दा बनवत असतील, तर त्यावर जनतेने नक्कीच विचार केला पाहिजे.